
भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी अधिनस्त

# कृषि विज्ञान केंद्र, किल्ला-रोहा (रायगड)



# पंतप्रधान पीक विमा योजना (PMFBY)

## कमी किंमतीत जास्त फायदा

सत्यमेव जयते

**माझ्या प्रिय शेतकरी बंधू आणि भगिनींनो,**

''पंतप्रधान पीक विमा योजने''ची बातमी आतापर्यंत आपल्याकडे पोहोचलीच असेल. आपल्या देशातील शेतकऱ्यांना नेहमी नैसर्गिक आपत्ती किंवा कृषिमालाच्या बाजारपेठेतील किंमतीत चढ-उतार याचीच चिंता असते. गेल्या १८ महिन्यात माझ्या सरकारने या प्रतिकूल प्रसंगामध्ये मदत देण्यासाठी अनेक पाऊले उचलली आहेत. शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना यापूर्वीही होती. परंतु त्यातील अनेक त्रुटींमुळे जसे की, विम्याचा जास्त दर, अत्यंत कमी विम्याची रक्कम, स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या तोट्यांचा समावेश नसणे,यामुळे या योजना यशस्वी ठरल्या नाहीत. परिणामी केवळ २० टक्के शेतकरी या योजनेत सहभागी झाले आणि त्यांना देखील आपला हक्क प्राप्त करण्यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. परिणामी पीक विमा योजनांवरील शेतकऱ्यांसाठी सोपी, सोयीची व फायद्याची अशी 'पंतप्रधान पिक विमा योजना' शेतकरी बंधू आणि भगिनींसाठी मी समर्पित करीत आहे.

## पंतप्रधान पिक विमा योजनेची वैशिष्ट्ये -

- पीक विम्यावर सरकारने दिलेले आजवरचे हे सर्वाधिक अर्थसहाय्य आहे. परिणामी यामध्ये शेतकऱ्यांसाठी विम्याचा दर फार कमी आहे.
- उर्वरित रकमेचा बोजा ९० टक्क्यांहून अधिक असेल तरीही, त्याचा भार शासन उचलणार आहे.
- खाद्यान्न, डाळी आणि तेलबियांसाठी विम्याचा दर एक हंगाम एक दर असेल.
- जिल्हानिहाय व पिकनिहाय विम्यासाठी वेगवेगळ्या दराची पूर्वीची तरतूद काढून टाकण्यात आली आहे. आता खरीपासाठी २ टक्के आणि रब्बीसाठी १.५ टक्के लागेल. संपूर्ण संरक्षण मिळेल.
- विम्याच्या रक्कमेवर कोणतीही सीमा नाही आणि परिणामी विम्याच्या रकमेत कोणतीही कपात नाही.
- स्थानिक आपत्तीच्या प्रसंगामध्ये पूर परिस्थिती व जलसंचय समाविष्ट करण्यात आले आहे.
- सुगी पश्चात चक्रीवादळ आणि अवकाळी पावसामुळे संपूर्ण देशात होणारे नुकसान देखील प्रथमच या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.
- उत्पन्नाचा अचूक अंदाज आणि विम्याचे दावे वेगाने निकाली काढण्यासाठी मोबाईल आणि उपग्रह तंत्रज्ञानाचा व्यापक प्रमाणात वापर करण्यात येणार आहे.

ही योजना खरीप २०१६ हंगामापासून लागू करण्यात येईल. सदर योजनेत भाग घेणे सोपे आहे आणि या योजनेतून शेतकऱ्यांना उच्च सुरक्षितता मिळणार आहे. आपण या योजनेत सहभागी व्हावे, अशी माझी विनंती आहे.

आपला,

नरेंद्र मोदी

**प्रश्न - पीक विमा म्हणजे काय ?**

उत्तर - पीक विमा हे पिकांशी निगडीत विविध जोखीमीमुळे शेतकऱ्यांना या पिकांच्या नुकसानापासून संरक्षण देण्याचे एक माध्यम आहे. नैसर्गिक आपत्ती व प्रतिकूल हवामान या अचानक निर्माण झालेल्या स्थितीत पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांचे रक्षण हा पीक विमा योजनेद्वारे होते.

**प्रश्न - सध्या कोणत्या पीक विमा योजना लागू करण्यात आल्या आहेत ?**

उत्तर - सध्या राष्ट्रीय कृषी विमा योजना (NAIS), सुधारित राष्ट्रीय कृषि विमा योजना (MNAIS), हवामानावर आधारित पीक विमा योजना (WBCIS) आणि नारळ विमा योजना (CPIS) राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना अधिक सुरक्षितता देण्यासाठी पंतप्रधान पिक विमा योजना (PMFBY) ही खरीप २०१६ हंगामापासून सुरु करण्यात येईल आणि राष्ट्रीय कृषी विमा योजना आणि सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना बंद करण्यात येतील.

**प्रश्न - आधीच्या योजना म्हणजे (NAIS) आणि (MNAIS) रब्बी २०१५-१६ पासून का बंद करण्यात येत आहेत ?**

उत्तर - या योजनांमध्ये ठराविक तरतुदी आहेत. ज्यामध्ये जास्त विमा दर दिल्यानंतर सुद्धा शेतकऱ्यांना नुकसानीची योग्य भरपाई मिळत नव्हती. जास्त विमा दरांच्या बाबतीत, विमा रक्कम विम्याच्या दरातील मर्यादेमुळे कमी करण्यात आली. शेतकऱ्यांना देखील उच्च जोखीम जिल्ह्यामध्ये जास्त विमा दर द्यावा लागत होता. शेजारच्या जिल्ह्यामध्ये विविध विमा दर आकारण्यात येत होते आणि शेतकऱ्यांच्या दाव्याची रक्कम देण्यात विलंब होत होता. ह्या योजना शेतकऱ्यांना उपयुक्त आणि लाभदायक नव्हत्या.
या कारणांमुळे रब्बी २०१५-१६ नंतर सदर योजना बंद करण्यात येत आहेत.

**प्रश्न – नव्या योजनेखाली शेतकऱ्यांना द्यावा लागणारा कमाल विमा दर किती असेल ?**

उत्तर – नव्या योजनेमध्ये शेतकऱ्यांसाठी कमाल विमा दर सर्व खरीप पिकांसाठी २ टक्के व रब्बी पिकांसाठी १.५ टक्के ठेवण्यात आला आहे. तसेच फळे व नगदी पिकांसाठी कमाल ५ टक्के विमा दर द्यावा लागेल. हा दर पूर्वी पेक्षा अत्यंत कमी आहे.

**प्रश्न - आधीच्या योजनेप्रमाणे शेतकऱ्यांना केपिंगची समस्या असेल का ?**

उत्तर - नाही, आधीच्या योजनांमध्ये जास्त विमा दराच्या बाबतीत विम्याची रक्कम कमी झाल्याने दाव्यांची रक्कम कमी होत असे. नव्या योजनेत ही तरतूद काढून टाकण्यात आली आहे. आता शेतकऱ्यांना विमा रक्कमेच्या तुलनेत संपूर्ण दाव्यांची रक्कम मिळेल.

**प्रश्न - सदर योजनेमध्ये कोणत्या जोखमी समाविष्ट आहेत ?**

उत्तर - सदर योजनेमध्ये खालील जोखमी समाविष्ट आहेत.

१) उत्पादनातील तोट्यावर आधारित आग, वीज पडणे, वादळ, गारपीट, चक्रीवादळ, पूर, जलमय होणे, दरड कोसळणे, दुष्काळ, वाईट हवामान, पिकावरील रोग आणि किटक इत्यादींमुळे होणारे उत्पादनातील तोटे संरक्षित करण्यासाठी सर्वसमावेषक जोखीम विमा पुरविण्यात येईल.

२) संरक्षित पेरणीवर आधारित पेरणी / रोवणीवर खर्च केल्यानंतर, प्रतिकूल हवामानामुळे शेतकरी पेरणी / रोवणी करु शकला नाही तर त्यांना विम्या रक्कमेच्या २५ टक्केपर्यंत दावे मिळू शकतील.

३) कापणीनंतर शेतात ठेवलेली पिके चक्रीवादळ, अवकाळी / चक्रीवादळी पाऊस यांच्या जोखीमांविरुद्ध बाधित शेतांनुसार संरक्षण दिले जाईल आणि दावे त्यानुसार मूल्यांकित करुन रक्कम दिली जाईल. संपूर्ण दाव्याची रक्कम मिळेल.

**प्रश्न - या योजनेत कोणते राज्य / केंद्रशासित प्रदेश सहभागी होणार आहेत ?**

उत्तर - ही योजना सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी वैकल्पिक आहे. तेव्हा सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यामध्ये सहभागी होऊ शकतात.

**प्रश्न - या योजनेमध्ये कोणकोणते शेतकरी कोणकोणत्या पिकांचा विमा घेऊ शकतात ?**

उत्तर - या योजनेत राज्य सरकार किंवा केंद्रशासित प्रदेश यांनी जाहीर केलेल्या विभागातील जाहीर केलेले कडधान्य, भरड धान्य, तेलबीया, फळे व नगदी पिके घेणारे शेतकरी या योजनेत सहभागी होऊ शकतात. ही नवी योजना केसीसी खाते धारकांसाठी (यांना कर्जधारक शेतकरी म्हणतात) अनिवार्य आहे आणि अन्य सर्व शेतकरी देखील त्यांना हवे असल्यास पीक विमा घेऊ शकतात.

**प्रश्न - या योजनेत शेतकरी पिक विमा कसा घेऊ शकतात ?**

उत्तर - या योजनेअंतर्गत बँकेकडून शेतकऱ्यांच्या नावे रक्कम खातेधारक शेतकऱ्यांच्या पिक विम्याच्या दराची रक्कम खात्यातून आपोआप विमा कंपनीकडे जमा करेल. (रक्कम खातेधारक म्हणजेच कर्जधारक शेतकरी होय.) इतर शेतकरी जवळच्या बँकेतून किंवा निर्धारित केलेल्या विमा कंपनीच्या एजंटकडे विम्याच्या दराची रक्कम जमा करुन पिक विमा घेऊ शकतात.

**प्रश्न - नव्या पिक विमा योजनेत शेतनिहाय नुकसानीची पहाणी करण्याचा नियम आहे काय ?**

उत्तर - नव्या पिक योजनेमध्ये स्थानिक आपत्तीमध्ये जसे की गारपीट, भूस्खलन, पूर परिस्थिती, जलमय होणे या स्थितीमध्ये शेतनिहाय नुकसानीची पहाणी केली जाईल. याचप्रमाणे पीक कापणीनंतर शेतामध्ये १४ दिवसांच्या आत चक्रीवादळ अथवा अवकाळी पाऊस झाल्यानंतर होणाऱ्या नुकसानीची शेतनिहाय पहाणी करुन विम्याचे दावे देयाबद्दल नियम केले आहेत.

**प्रश्न - नुकसानीच्या परिस्थितीत पिक विम्याच्या रकमेचे दावे त्वरीत निकाली काढण्यासाठी काही उपाय योजना केल्या आहेत काय ?**

उत्तर - या नव्या योजनेत, पीक कापणीच्या प्रयोगाचे छायाचित्र घेण्यासाठी स्मार्टफोन्स वापरले जातील आणि ते संगणकाशी जोडले जातील म्हणजे विमा कंपन्यांना उत्पादनाची आकडेवारी शक्य तितक्या लवकर मिळेल. यामुळे दावे लवकर निकाली काढण्याची खात्री होईल. सुदुर संवेदन तंत्रज्ञान आणि ड्रोन्समुळे पीक कापणीचे प्रयोगांची संख्या कमी होईल आणि उत्पादनातील नुकसानीची आकडेवारी त्वरीत काढता येईल.

**प्रश्न - या नव्या पिक योजनेखाली प्रतिकुल हवामानामुळे पेरणी / रोपणी झालेली नसल्यास नुकसान भरपाई देण्याची तरतुद आहे काय ?**

उत्तर - होय, प्रतिकुल हवामानामुळे पेरणी / रोपणी न झाल्यास विमा करण्यात आलेल्या पिकांसाठी विम्याच्या रक्कमेच्या २५ टक्के रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची तरतूद केली आहे.

**प्रश्न - नव्या योजनेमध्ये विम्याचे युनिट काय आहे ?**

उत्तर - ही योजना ''क्षेत्र-निहाय'' तत्वावर राबवली जाईल. प्रमुख पिकांसाठी विम्याचे युनिट हे गाव/ ग्रामपंचायत आणि इतर पिकांसाठी, विम्याचे युनिट हे राज्य सरकार निश्चित करेल आणि ते गाव / ग्रामपंचायतीच्या युनिटपेक्षा अधिक असू शकेल.

**प्रश्न - नवीन पीक विमा योजनेखाली दिली जाणारी विम्याची रक्कम किती असेल ?**

उत्तर - या नव्या योजनेत जिल्हास्तरीय तांत्रिक समिती पिकांसाठी वित्त पुरवठ्याचे प्रमाण ठरवेल आणि त्या पिकासाठीची पिक विम्याची रक्कम म्हणून वित्त पुरवठ्याचे प्रमाण ठरवेल आणि त्या पिकासाठी ती पीक विम्याची रक्कम म्हणून विचारात घेतली जाईल.

**प्रश्न - पूर्वीच्या हवामान आधारित पीक विमा योजनेत (WBCIS) कोणत्या सुधारणा करण्यात आल्या आहेत ?**

उत्तर - पूर्वीच्या हवामान अधारित पीक विमा योजनेत सुधारणा करण्यात आली असून प्रशासकीय व व्यवस्थापकीय तरतुदी पंतप्रधान पीक विमा योजनेच्या अनुरुप केले गेले आहेत. या योजनेअंतर्गत आता शेतकऱ्यांसाठी पीक विम्याचा खरीप जास्तीत जास्त २ टक्के व रब्बीसाठी जास्तीत जास्त १.५ टक्का इतका केला असून फळे/नगदी पिकांकरीता५ टक्के इतका केला आहे. विम्याच्या रक्कमेवरील उच्चतम मर्यादा सुद्धा काढून टाकण्यात आली असून शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची पूर्ण विमा रक्कम मिळू शकेल.

# सक्षम शेतकरी, समृद्ध भारत

## बळीराजाची सुरक्षितता

### पंतप्रधान पीक विमा योजना

पीक विम्याखाली सरकारद्वारे आतापर्यंत सर्वात मोठे अर्थसहाय्य - फळे व नगदी पीके शेतकऱ्यांना सर्वात कमी विम्याचा दर, एक पीक-एकच विम्याचा हप्ता (खरीप - २ टक्के, रब्बी - १.५ टक्के)

संपूर्ण संरक्षण - हमीप्राप्त रकमेच्या मुल्यात कोणतीही कपात नाही किंवा कमाल २१ हजार कोटीपासून रु. २५०० कोटीपर्यंत थकबाकी कमी करण्यात आली. निर्यात शुल्कात वाढ, इथेनॉल मिश्रणामध्ये २५० टक्के वाढ नैसर्गिक आपत्तीमधील मदतीचे निकष, भरपाईमध्ये दीडपटीने वाढ, पात्रता निकष ५० टक्क्यांवरुन ३३ टक्के कमी करण्यात आला. सार्वजनिक खरेदी मधील मानदंडामध्ये सवलत, कर्ज परतफेडीसाठी कालमर्यादेत बदल, भांडवल सबसिडीमध्ये ५० टक्के वाढीसह डीझेलमध्ये सबसिडी.

शेतकऱ्यांसाठी कर्ज उपलब्धता वाढविण्याकरीता, कृषी विषयक कर्ज मर्यादा वाढवून ८.५ लाख कोटी करण्यात आली.

जागतिक व्यापार संघटनेमध्ये - शेतकऱ्यांच्या दीर्घकालिन हितांचे संरक्षण करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांची शक्ती

पंतप्रधान कृषी सिंचन योजना - सिंचन प्रकल्प आणि पाणलोट क्षेत्र विकास (प्रत्येक शेतासाठी पाणी), ठिबक सिंचन (प्रती थेंब-अधिक पीक) संपूर्ण सिंचन प्रकल्प उद्दीष्टाच्या अनुरुप करण्यात आले.

दीन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना - शेती आणि गावांसाठी वीज पुरवठ्याकरिता स्वतंत्र फिडरची निर्मिती.

तीन कोटी उपयुक्त कृषी पंपाचे वाटप योजना - सिंचन सुविधांमध्ये सुधारणा आणि शेती उत्पन्नामध्ये वाढ होणार.

मृदा आरोग्य पत्रिका - सुदृढ जमीन, हिरवीगार शेती, ७९ लाख मृदा आरोग्य पत्रिकेचे वितरण मार्च २०१७ पर्यंत सर्व पत्रिका वितरीत करण्याचे उद्दीष्ट.

कडूनिंब लेपीत युरीया - खतांची परिणामकारकता वाढविणे आणि अन्य क्षेत्रामध्ये त्याच्या वापरास प्रतीरोध करण्यासाठीची योजना.

नवीन खत धोरण - खताची कोणतीही टंचाई टाळणे आणि संपूर्ण उलब्धतेची खात्री करण्यासाठी खतांचे उत्पादन वाढविण्या करीता उपयोगी.

सर्व राज्ये करणार राष्ट्रीय कृषी बाजारपेठेचा विकास - राज्यांच्या सहयोगाने राष्ट्रीय कृषी बाजारपेठ विकसित करण्यासाठी एकच ई-मंच प्रस्थापित करण्यासाठी योजना.

किसान टीव्ही - शेतकऱ्यांना हवामान, मंडया, आणि अन्य माहिती मिळविण्यासाठी २४ x ७ दुरदर्शन वाहिनीची सुरुवात.

## शेतकऱ्यांचा विकास -

परंपरागत कृषि विकास योजना - सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देणारी आजवरची पहिलीच योजना.

निल क्रांती - मत्स्योद्योगातील वृद्धी दर ५.८ टक्क्यांवरुन ७.२५ टक्के झाला.

धवल क्रांती - दुध उत्पादनात १४६ दशलक्ष टनावरुन १६० दशलक्ष टन वाढ झाली.

राष्ट्रीय गोकुळ मिशन - देशी प्रजातींचे संवर्धन आणि त्यांच्या विकासाला चालना देण्यासाठी गेल्या १८ महिन्यांमध्ये रु. ५५० कोटी किंमतीच्या योजना राबविण्यात आल्या आहेत.

**डॉ. रणजीत प्रतापराव महाडीक**
विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार)
कृषि विज्ञान केंद्र, किल्ला-रोहा, जि. रायगड

**डॉ. मनोज सुधाकर तलाठी**
प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ
कृषि विज्ञान केंद्र, किल्ला-रोहा, जि. रायगड

**डॉ. संजय भावे**
संचालक, विस्तार शिक्षण,
डॉ. बा. सा. को. कृ. वि., दापोली

- अधिक माहीतीसाठी संपर्क - **कृषि विज्ञान केंद्र, किल्ला - रोहा.**

ता. रोहा, जि. रायगड - ४०२ ११६, फोन नं. ०२१९४ - २०३१०८
E-mail : kvk_roha@yahoo.co.in / kvk_roha@rediffmail.com

विम्यासाठी आपल्या नजिकच्या बँक शाखेत, कृषि सहकारी संस्था, कृषि व संलग्न विभाग, विमा किंवा त्यांचे एजंट यांच्याशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी इथे भेट द्या : http://www.agri.insurance.gov.in